# पुणे विद्यापीठ
## राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे - ४११००७.

डॉ. शाकेरा इनामदार
एम्.एस्सी.,पी.एच्.डी
कार्यक्रम समन्वयक

कार्यालय क्र.: ०२०-२५६९७३४१
२५६०११५३, २५६०११६०
फॅक्स क्र.: ०२०-२५६९७३४१
मोबाईल : ९८२२७०७०६१


रासेयो/1175/१२ दि. १९ जाने.२०१२

प्रति
मा.प्राचार्य /रासेयो कार्यक्रम अधिकारी,
रासेयो संलग्नित महाविद्यालये
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा

विषय :— 'राष्ट्रीय मतदार दिन' निमित्त .....

महोदय,

मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांनी कळविल्यानुसार समाज व विद्यार्थ्यांमध्ये मतदानाविषयी जागृती होणेकरीता तसेच आजचा मतदाता जागृत होणेकरीता '२५ जानेवारी 'राष्ट्रीय मतदार दिन' निमित्त राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. तरी रासेयो महाविद्यालयांनी खालील विषयांवर आधारीत प्रोस्टर, वक्तृत्व, निबंध, पथनाट्ये, रॅली अशाप्रकारे विविध स्पर्धांचे आयोजन रासेयो महाविद्यालयांमध्ये करावे.

- लोकशाहीत मतदानाचे महत्व
- आजचा मतदार उदासिन ?
- माहिती तंत्रज्ञान व निवडणूक प्रक्रिया
- नि:पक्षपाती निवडणूक व निवडणूक आयोग

तसेच 'राष्ट्रीय मतदार दिन' निमित्त दि. २५ जानेवारी २०१२ रोजी राष्ट्रीय सेवा योजना, पुणे विद्यापीठ यांच्या अंतर्गत पुणे जिल्हयातील रासेयो महाविद्यालयांकरीता विद्यापीठस्तरीय **'पथनाट्य स्पर्धे'चे** आयोजन नामदेव सभागृह, पुणे विद्यापीठ येथे करण्यात आले आहे.

तरी सदर स्पर्धेकरीता पुणे जिल्हयातील महाविद्यालयांनी १० रासेयो स्वयंसेवकांना दि. २५ जानेवारी २०१२ रोजी सकाळी १०.०० वाजता पुणे विद्यापीठ, नामदेव सभागृह याठिकाणी स्पर्धेच्या संपूर्ण तयारीने पाठवावे ही विनंती.

कळावे.

आपली विश्वासू

कार्यक्रम समन्वयक,
रासेयो, पुणे विद्यापीठ